दि. 15/03/2026

# प्रेसनोट

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची नांदेडात कारवाई

## जुगार अड्डा व अवैध रेती वाहतुकीविरुद्ध कारवाई करत 32 लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक नांदेड जिल्हयातील हिमायतनगर भागात रवाना केले होते.

सदर पथकाने, दिनांक 14/03/2026 रोजी हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गंगाधर दंडेवाड यांचे शेतात जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत, 27,000/-रुपयांची रोकड, (04) मोबाईल व (03) मोटार सायकली असा एकूण 1,81,000 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (4) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द हिमायतनगर पोलीस ठाणे येथे गुरनं 72/2026 कलम 12 (अ), महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास हिमायतनगर पोलीस ठाण्यातील पोहेकॉ/ दिलीप जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे, सदर पथकाने भोकर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिठा ते भोकर रोडवर अवैधरित्या रेती वाहतुक करणाऱ्या हायवावर कारवाई करत, रुपये 30 लाख किंमतीचा भारत बेंज कंपनीचा एक हायवा व 25 हजार रुपयांची 05 ब्रास रेती असा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एका आरोपीस ताब्यात घेवून, त्याचेविरुध्द भोकर पोलीस ठाणे येथे गुरनं 118/2026 कलम 303 (2), 3(5) भा.न्या.सं. सह कलम 48(7), 48(8) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविला आहे. सदर प्रकरणाचा तपास भोकर पोलीस ठाण्यातील पोहेकॉ/ तुकाराम केंद्रे हे करत आहेत.

उपरोक्त दोन्ही कारवायांत, पथकाने एकूण 27,000/- रुपयांची रोकड, (04) मोबाईल, (3) मोटार सायकली, (1) हायवा व (5) ब्रास वाळू असा एकूण 32 लाख 06 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

**दिनांक 16 मार्चपासून गुटखा विरुद्ध मोहीम :** परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत, 16 ते 30 मार्च दरम्यान, गुटखा विरोधी मोहीम राबविण्यात येणार आहे. यात स्वादिष्ट/ सुगंधित तंबाखू, अपमिश्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट /सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण वितरण व वाहतूक याविरुद्ध कलम 123 बी.एन.एस. प्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे. यादरम्यान, अशा पदार्थांची विक्री करणाऱ्या पान टपऱ्या व संभाव्य साठवणुकीची ठिकाणे यांच्या तपासण्याची मोहीम हाती घेण्यात येत असून, संबंधिताविरुद्ध कलम 123 बी एन एस अन्वये करण्यात येणाऱ्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असल्याने व त्यास **दहा वर्षे सक्त मजुरी** सह द्रव्य दंडाची देखील शिक्षा असल्याने, संबंधितांनी अशा पदार्थांच्या व्यवहारांपासून दूर राहणे हितावह राहील, असे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

परिक्षेत्रात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणे नागरिकांना सोपे व्हावे म्हणून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली **'खबर'** नावाची हेल्पलाइन सुरू केली आहे. नागरिकांनी जागरूक होऊन, आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे देखील आवाहन श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड